# प्रेसनोट

## २१ जुन आंतरराष्ट्रीय योग दिन २०१८

## योग म्हणजे निरोगी आरोग्याची हमी - सुनिल फुलारी यांचे प्रतिपादन.

राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ रामटेकडी, पुणे येथे ४ था आंतरराष्ट्रीय योगदिन आज उत्साहपुर्ण वातावरणात संपन्न झाला. भारतीय योग संस्था, नवी दिल्ली, यांचे मगरपट्टा पुणे शाखेच्या सहकार्याने दि.१५/०६/२०१८ ते २१/०६/२०१८ पर्यंत योग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन गटाचे समादेशक श्री. सुनिल फुलारी, भा.पो.से. रा.रा.पो.बल गट क्र.१ पुणे यांनी केले होते. गट क्र.१ पुणे येथे कार्यरत असणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता समादेशक यांचे संकल्पनेतुन कायमस्वरुपी कामी पडेल अशी पोलीस उपक्रम व योग व माहिती पुस्तकाचे अनावरण या वेळी करण्यात आले. या पुस्तकामध्ये पोलीस जवानांस देय असणारे सर्व पोलीस कल्याणकारी योजनांची माहिती समाविष्ठ करण्यात आलेली आहे. त्यांचबरोबर यामध्ये योगाची आसने व त्यांचे फायदे अशी माहिती सन २०१८-१९चे कॅलेंडर यामध्ये आहे. महाराष्ट्रातील पहिला असा अनोखा उपक्रम या निमित्ताने समादेशक यांच्या संकल्पनेतुन साकार झाला आहे.

गटाचे समादेशक श्री सुनिल फुलारी म्हणाले की, दैनंदीन जीवनात योग हा जीवनाला योग्य बनवण्यासाठी खुप महत्वाचा आहे. योगाच्या नियमिततेमुळे कोणत्याही मनुष्याला आंतरीक उर्जा निर्माण होण्यास मदत होवुन सकारात्मक विचारशैलीची बांधणी होते. राज्य राखीव पोलीस दलाचे जवान कायम अंतर्गत सुरक्षा बंदोबस्तामध्ये कार्यरत असतात. त्यामुळे अगदी सहज वेळेत वेळ काढुन आपण योगाच्या माध्यमातुन आपले स्वास्थ्य जपु शकतो. योगामुळे सहज आपण आपले आयुष्य सुखमय व कायम निरोगी राखु शकतो त्यामुळे योगा म्हणजे निरोगी जीवनाची हमी आहे.

सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी, सेवांतर्गत प्रशिक्षण घेणारे पोलीस अधिकारी/कर्मचारी, कुटुंबीय असे एकुण ६०० व्यक्तींनी या योग शिबीरामध्ये सहभागी होवुन योग प्रशिक्षण सप्ताहाचा लाभ घेतला. सौ.कविता कोतकर यांनी सर्वांचा योगाभ्यास घेतला. कार्यक्रमाचे समारोपीय अध्यक्षीय भाषणातुन गटाचे समादेशक श्री. सुनिल फुलारी प्रतिपादन केले की, योगा म्हणजे भारतीय संस्कृतीने जगाला दिलेले वरदान आहे. भारतीय योग संस्थेचे मगरपट्टा, पुणे शाखेचे सौ.शोभना गवस, सौ.कविता कोतकर, डॉ.राजन पटेल, श्री प्रशांत गजभिये, श्री पांडुरंग गवस, श्री काशीनाथ तळेकर, श्री अशोक झाव्हर, श्री.सुभाष श्रॉफ, श्री अशोक रंदवे, सौ.अनिता रेपे यांनी योगाच्या प्रशिक्षण देवुन मोलाचे काम केले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी समादेशक सहायक श्री.सुभाष सोनवणे, राजेंद्र मोरे, सुभाष पांडव, पोलीस निरीक्षक श्री. बाळु पाटील, प्रभाकर शिंदे, रमेश वेठेकर, विठ्ठल पाटील, पोलीस उपनिरीक्षक श्री. चंद्रकांत ठाकरे, पोना गणेश मरकड यांनी विशेष परिश्रम घेत आहेत.





